सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# जिल्हा उद्योग केन्द्र

## नागपूर

NAGPUR

उद्योग संचालनालय

## उद्योग विभागाच्या योजना

- स्वयंरोजगार योजना
- उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम
- सामुहिक प्रोत्साहन योजना
- जिल्हा पुरस्कार योजना
- उद्योग आधार नोंदणी

उद्योग भवन, २रा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर
फोन : ०७१२ – २५६५९७४, २५६४८४२
ई–मेल : didic.nagpur@maharashtra.gov.in
वेबसाईट : www.di.maharashtra.gov.in




## १) पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना (PMEGP)

उद्देश :

१) देशभर नवीन सुक्ष्म व लघु उद्योग/उपक्रम स्थापित करून ग्रामीण व शहरी भागात रोजगार निर्मिती करणे असा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

२) ही योजना संपूर्ण राज्यात जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग मंडळ व खादी ग्रामोद्योग आयोग आणि बँकेमार्फत राबविली जाते.

योजनेची वैशिष्टये :

१) उद्योगासाठी प्रकल्प मर्यादा रू. २५ लाखापर्यंत आणि व्यवसाय व सेवा उपक्रमाकरीता रू. १० लाखापर्यंत

२) अर्थसहाय्य व अनुदान

| | लाभार्थी प्रवर्ग | लाभार्थी सहभाग प्रकल्प किंमतीच्या | अनुदानाचा दर प्रकल्प किंमतीच्या | |
|---|---|---|---|---|
| अ | क्षेत्र | | शहर | ग्रामीण |
| ब | सामान्य प्रवर्ग | १०% | १५% | २५% |
| क | विशेष प्रवर्ग (अ.ज.अ.जा.इमाव, अल्पसंख्यांक, महिला, माजी सैनिक, अपंग) | ५% | २५% | ३५% |

३) सामान्य प्रवर्गातील अर्जदारास बँक प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के आर्थिक मदत देईल व विशेष प्रवर्गातील अर्जदारास ९५ टक्के आर्थिक मदत देण्यात येईल.

४) रिझर्व बँकेच्या मार्गदर्शन तक्त्यानुसार व्याजाचे दर आकारण्यात येईल.

५) कर्जाची परतफेड ३ ते ७ वर्षाचे आंत करावयाची आहे.

६) रू. ५ लाखाचे वरील प्रकल्पात गहाण व जमानदार आवश्यक आहे.

७) कर्जवाटपानंतरच्या ३ वर्षाच्या आत उद्योग बंद झाल्यास अनुदानास अपात्र ठरतील.

८) पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेची अंमलबजावनी ऑनलाईन प्रणाली मार्फत सुरू आहे. अर्जदारास अर्ज ऑनलाईन करने आवश्यक आहे. अर्ज करावयाचे संकेतस्थळ www.kvionline.gov.in/pmegpeportal वर अर्ज ऑनलाईन प्रणालीवर करण्याकरीता खालील कागदपत्र स्कॅन करून अपलोड करावे.

   १) पासपोर्ट साईज फोटो २) आधार कार्ड ३)जातीचे प्रमाणपत्र (SC, ST, OBC, Minority, Handicap)

   ४) शैक्षणिक प्रमाणपत्र (Mark Sheet, Leaving Certificate) ५) EDTP ट्रेनिंग प्रमाणपत्र ६) प्रकल्प अहवाल

   ७) जर उद्योग ग्रामीण भागात असल्यास ग्रा.प. चे लोकसंख्येबाबतचे प्रमाणपत्र